राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे

# राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धा

सन 2022-23

गट – प्राथमिक शिक्षक

## नवोपक्रमाचे नाव

# “निसर्गाच्या सानिध्यात जाऊया बोलीभाषेतून प्रमाण भाषा शिकूया”

## नवोपक्रमकर्त्या शिक्षकाचे नाव

श्री. श्रीकांत गटय्या काटेलवार
एम. ए., डी. एड, डी. एस्. एम्.
मोबा. क्र. 9422728944
Email ID : katelwar86@gmail.com
शाळा : जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, वाळवी
केंद्र : गट्टा तालुका : एटापल्ली जि. गडचिरोली
युडायस क्र. 27120720701

## मार्गदर्शक

श्रीमती वैशाली येगोलपवार
अधिव्याख्याता
जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, गडचिरोली.

–

## नवोपक्रम सादरकर्त्याचा परिचय



| | |
|---|---|
| **शिक्षकाचे नाव** | : श्री. श्रीकांत गटय्या काटेलवार |
| **पद** | : प्राथमिक शिक्षक |
| **शाळेचे नाव व पत्ता** | : जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, वाळवी केंद्र गट्टा, ता. एटापल्ली जि. गडचिरोली |
| **युडायस क्र.** | : 27120720701 |
| **मोबा. क्र.** | : 9422728944 |
| **जन्मतारीख** | : 02/01/1986 |
| **सेवा आरंभ दिनांक** | : 17/01/2009 (जि. प. नाशिक येथे प्रथम नियुक्ती) |
| **शैक्षणिक अर्हता** | : एम. ए., डी. एड, डी. एस्. एम्. |
| **सध्याचे शाळेवर नियुक्ती दि.** | : 18/06/2019 (जि. प. गडचिरोली येथील सदर शाळेवर नियुक्ती) |
| **कायमचा पत्ता** | : मु. पो. ता. अहेरी जि. गडचिरोली पिनकोड 442705 |
| **एकूण सेवा** | : 13 वर्ष 10 महिने |
| **नवोपक्रम गट क्र.** | : गट क्र. 2 |
| **नवोपक्रम गटाचे नाव** | : प्राथमिक गट |
| **नवोपक्रम योजलेला कालावधी** | : जुलै 2022 पासून आजतागायत ... |

**प्रतिज्ञापत्र**

मी श्री/श्रीमती - श्रीकांत गटय्या काटेलवार प्रतिज्ञा पत्र लिहून देतो की, या नवोपक्रम स्पर्धेसाठी सादर केलेला **"निसर्ग सानिध्यात जावूया. बोली भाषेतून प्रमाण भाषा शिकूया"** हा नवोप्रकम माझ्या स्वत:च्या शैक्षणिक उपक्रमावर, अनुभवावर आधारित आहे. हा नवोपक्रम मला स्वत:ला सुचलेला आहे, काल्पनिक नाही. तसेच भारतीय अथवा विदेशी लेखकांच्या ग्रंथातील अथवा संशोधनातील माहितीच्या आधारे हा नवोपक्रम लिहिलेला नसून यामध्ये मला जाणवलेल्या समस्यांचे सुक्ष्म अभ्यास करण्याचा मी प्रयत्न केलेला आहे. हा नवोपक्रम यापूर्वीच्या राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धेसाठी सादर केलेला नाही. तसेच इतर कोणत्याही व्यक्तीकडून लिहून घेऊन तो मी माझ्या नावावर सादर केलेला नाही. तसे आढळून आल्यास तो कॉपीराईट अॅक्ट 1957 खाली दाखलपात्र गुन्हा आहे याची मला कल्पना आहे.

दिनांक : 17/11/2022

स्थळ : वाळवी

जि.प.प्राथ.शाळा,वाळवी
केंद्र गट्टा, पं.स.एटापल्ली
युडायस क्रमांक 27120720701

स्पर्धकाची स्वाक्षरी

श्रीकांत गटय्या काटेलवार

शाळेचा/कार्यालयाचा शिक्का.

**प्रमाणपत्र**

प्रमाणित करण्यात येते की, श्री/श्रीमती - श्रीकांत गटय्या काटेलवार हे माझ्या शाळेत/कार्यालयात कार्यरत असून त्यांनी सादर केलेला **"निसर्ग सानिध्यात जावूया. बोली भाषेतून प्रमाण भाषा शिकूया"** हा नवोपक्रम शैक्षणिक वर्ष 2022-23 मध्ये त्यांनी स्वत: राबविलेला असून ती त्यांच्या स्व परिश्रमाची फलश्रुती आहे. हा नवोपक्रम त्यांनी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे मार्फत आयोजित यापूर्वीच्या राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धेसाठी सादर केलेला नाही.

दिनांक : 17/11/2022

स्थळ : एटापल्ली

शाळा/कार्यालय प्रमुखाची स्वाक्षरी

नाव : ..............

शिक्का : गट शिक्षणाधिकारी
पंचायत समिती एटापल्ली

श्री. दिपक देवतळे ग.शि.अ.
पं. स. एटापल्ली जि. गडचिरोली

<u>अनुक्रमनिका</u>


| अ. क्र. | अहवाल लेखन घटक | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १ | नवोपक्रमाचे शीर्षक | ५ |
| २ | प्रस्तावना | ६ - ७ |
| ३ | नवोपक्रमाची  गरज व महत्व | ८ - ११ |
| ४ | नवोपक्रमाची उद्दिष्टे | १२ |
| ५ | नवोपक्रमाचे नियोजन | १३ - २१ |
| ६ | नवोपक्रमाची कार्यपध्दती | २२ - २७ |
| ७ | नवोपक्रमाची यशस्विता/फलनिष्पती | २८ - २९ |
| ८ | समारोप | ३० |
| ९ | संदर्भ सूची व परिशिष्टे | ३१ - ३९ |

१) <u>नवोपक्रमाचे शीर्षक</u> :-

# “निसर्गाच्या सानिध्यात जाऊया, बोली भाषेतून प्रमाण भाषा शिकूया”

**२) प्रस्तावना :-**

गडचिरोली जिल्हयातील अतिशय दुर्गम, दुर्लक्षित, नक्षल प्रभावित एटापल्ली तालुक्यातील डोंगराच्या कुशीत वसलेलं 'वाळवी' हे गावं.... चार बाजुंनी घनदाट जंगलानी व्यापलेला जिथे विकासाची गंगा अजूनही पोहचलेली नाही. गावापर्यंत अजूनही रस्ता नाही. पायवाटेनेच गाव गाठता येईल. पावसाळयात वाळवीला पोहचणे म्हणजे कर्मकठीणच ! चारही बाजूने डोंगराच्या कुशीत उगम पावणाऱ्या असंख्य नदया नाले पावसाळयात दुथडी भरुन वाहून वाटेत आट मांडून उभे राहतात. नवीन पाहुणा कधीच या नव्या गावात पोहचणार नाही. कारण घनदाट जंगलातील भुलभुलैय्या पायवाटेच्या चक्रव्युहात कधी फसेल याचा काही नेम नाही.

नाशिक जिल्हा परिषदेतून १२ वर्षाच्या प्रदीर्घ सेवेनंतर स्वजिल्हयात आलो तेव्हा स्वजिल्हयात आल्याचा आनंद विलक्षण होता. त्यानंतर जेव्हा नियुक्ती एटापल्ली तालुक्यातील वाळवी या शाळेवर झाली तेव्हा एकूण भौगोलिक परिस्थिती व शाळेची दयनीय अवस्था पाहून माझ्यासमोर फार मोठे आव्हान उभे राहिले. मी ते आव्हान स्वीकारुन विद्यार्थ्यांच्या संगतीने अध्ययन-अध्यापनाला सुरुवात केली.

माझ्या वाळवी गावात माडिया व ओरॉव या आदिवासी जमातीतील दोनशे लोकांची वस्ती. गावात माडिया ही बोलीभाषा बोलली जाते. येथील ग्रामस्थांना मराठी भाषेचा गंध नाही. मराठी भाषा काहीच समजत वा उमजत नाही. वाळवी या माडिया वस्तीवर जिल्हा परिषदेची १ ते ४ वर्ग असलेली माझी एक शिक्षकी शाळा....



इमारत धोकादायक, संपूर्ण गळकी व जीर्ण बनलेली आहे. इमारत पावसाळयात तर अधिकच भीषण वाटते. इमारतीच्या भिंतीला मोठे मोठे भगदाड पडले असून इमारत कधी उन्मळून पडेल याचा काही नेम नाही. विद्यार्थ्यांना घेवून सदर इमारतीत बसणे धोकादायक आहे हे ओळखून ग्रामस्थ व प्रशासनाच्या सूचनेनुसार शाळेलगत असलेल्या गोटूल मध्ये शाळा भरवण्याचे सुरु केले.

गावातील सर्वानी ‘पंडूम सण’ साजरा करीत प्रत्येक कुंटूंबातील प्रत्येकाचा सहभाग घेत नव्या दिमाखात ‘गोटूलरुपी मिनी शाळेची’ उभारणी झाली.

**मोडून पडला संसार तरी मोडला नाही कणा.....**

**पाठीवरती हात ठेवून फक्त लढ म्हणा ....!**

कवी कुसुमाग्रजांच्या या ओळींची या क्षणी आठवण झाली.

माडिया आदिवासीची बोलीभाषा माडिया व शिक्षणाची भाषा ‘मराठी’ आहे. ही त्यांच्या शिक्षणात मोठी अडचण होती. आदिवासी मुलांना प्रमाण भाषा समजत नव्हती. शिक्षकांनी मराठीतून शिकवलेलं मुलांना समजत नव्हते. मुलांना मराठीतून अध्यापन केल्यामुळे मुलांना शिक्षण नीरस वाटायचे याचा परिणाम शाळेच्या उपस्थितीवर व्हायचा, मुलांची शाळेत उपस्थिती खूपच कमी राहायची.

शाळेची जीर्ण इमारत व स्थानिक बोली भाषा-माडिया यामुळे विद्यार्थ्यांना प्रमाण भाषेत वाचन करतांना येणाऱ्या अडचणी लक्षात घेऊन माडिया बोलीभाषेतून प्रमाण भाषेत गोटूलमध्ये मिनी शाळा भरवून निसर्गातील घटकांचा शैक्षणिक साहित्य म्हणून वापर करुन विद्यार्थ्यांचे वाचन कौशल्य वाढविणे यासाठी हा नवोपक्रम हाती घेतला.

३) **<u>नवोपक्रमाची गरज</u>** :-

शाळेची इमारत अतिशय जीर्ण धोकादायक असून सदर इमारतीत विद्यार्थ्यांना बसविणे धोक्याचे आहे हे ओळखून शाळेलगत असलेल्या गोटूलमध्ये शाळा भरविण्याचा निर्णय घेतला.

प्रत्येक व्यक्तीच्या जीवनात भाषा शिक्षणाचे महत्व आहे. भाषा हे शिक्षणाचे अनन्यसाधारण महत्वाचे अंग आहे. भाषा शिक्षणात भाषेचे मानवी जीवनातील स्थान व्यक्तीच्या आचार विचार, अभिव्यक्ती, अभिवृत्ती यात दिसून येते. भाषा विकास प्रक्रियेत भाषेच्या मुलभूत कौशल्यांचा विकास केला गेला. भाषा विकासावर परिणाम करणाऱ्या घटकांचा अभ्यास बालकांच्या भावी जीवनात मौखिक संप्रेषण साधण्यासाठी मुलभूत कौशल्यातील वाचन कौशल्याकडे काळजीपूर्वक पाहणे अगत्याचे ठरते.

माडिया बोलीभाषा ही विद्यार्थ्यांच्या शिक्षणात मोठी अडचण होती. या आदिवासी मुलांना प्रमाण भाषा अजिबात येत नव्हती. त्यामुळे शाळेतील विद्यार्थ्यांची उपस्थिती कमी राहत होती. विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढविण्यासाठी विद्यार्थ्यांच्या वाचन कौशल्य विकासाकडे लक्ष देणे गरजेचे बनले आहे.

विद्यार्थ्यांचे स्थानिक बोली भाषेतून अक्षर-शब्द-वाक्य ज्ञान वाढवून वाचन कौशल्याचा विकास करणे हा नवोपक्रम राबविल्यास निश्चितच विद्यार्थ्यांना लाभ होईल हा विश्वास नवोपक्रम कर्त्याला आहे. माडिया बोली भाषेतून विद्यार्थ्यांना प्रमाण भाषेकडे नेण्याचा नवोपक्रम कर्त्याचा हा कमी खर्चिक प्रयत्न.... गोटूलमधील उपलब्ध साधनांचा वापर कल्पकतेनुसार करुन विद्यार्थ्यांना प्रमाण भाषेतून बोलते करण्याचा माझा प्रयत्न.....

गडचिरोली जिल्हयात मुलभूत क्षमता विकास कार्यक्रम (फुलोरा कार्यक्रम) मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या मार्गदर्शनात सुरु आहे. त्या अनुलक्षणाने सदर उपक्रम अंतर्गत कृतीचे अध्ययन-अध्यापनात अनुभव देण्याचे सराव व साहित्याची निर्मिती शाळेत सुरु आहे. त्यादृष्टीने सदर उपक्रम खूप उपयोगी आहे.

जंगल भर भिरभिरणारी ही आदिवासी मुले एका जागी स्थिर बसणारी नाहीत हे शिक्षकांनी जाणून स्थानिक माडिया बोली भाषेतून अध्यापन सुरु केले. अक्षर-शब्द-वाक्य ज्ञान दृढीकरण करुन वाचन कौशल्याचा विकास करण्यासाठी सदर नवोपक्रम हाती घेण्यात आला. वाचन करतांना विद्यार्थ्यांना येणाऱ्या अडचणी दूर करुन मराठी भाषेविषयी प्रेम वाढवून शैक्षणिक गुणवत्ता

वाढविण्यासाठी '**निसर्गाच्या सानिध्यात जाऊया, बोली भाषेतून प्रमाण भाषा शिकूया**' या नवोपक्रमाची निर्मिती झाली.

- **नवोपक्रमाचे वेगळेपण** :-

या उपक्रमाचे वेगळेपण असे आहे की, साधारणपणे बरचसे नवोपक्रम सादरकर्ते विद्यार्थ्यांना चार भिंतीच्या आड अनुलक्षून विद्यार्थ्यांच्या अभ्यासविषयक बाबींशी निगडीत उपक्रम राबवितात परंतु माझा नवोपक्रम....

**१) निसर्गातील साधने वापरुन वाचन कौशल्य विकास :** गोटूलमधील तसेच बाहेरील नैसर्गिक साधने वापरुन वाचन कौशल्य विकास वाढविण्यासंदर्भात आहे.

**२) धोकादायक शाळेच्या इमारतीला पर्याय व्यवस्था :** महाराष्ट्रातील बहुतेक शाळांची स्थिती खूप भयानक आहे. त्यातच 'इमारती विना शाळा' अश्या बहुतेक शाळेची परिस्थिती असते. अशा परिस्थितीत उपलब्ध पर्यायी व्यवस्था करुन विद्यार्थ्यांच्या शिक्षणात खंड पडू नये यासाठी प्रयत्न करायला हवे. माझ्या शाळेची इमारत पूर्णत: जीर्ण धोकादायक असल्यामुळे गोटूलमध्ये शाळा भरवून त्या बिकट परिस्थितीतून मार्ग काढण्याचा प्रयत्न करीत आहे.

**३) आदिवासी संस्कृतीतील घटकांचा उपयोग :** माडिया आदिवासी बांधवाच्या संस्कृतीतील घटकांचा उपयोग वाचन कौशल्य वाढविण्यात करण्यात आला.

**४) माडिया बोली भाषेतून शिक्षण :** आदिवासी मुलांना शिकणे सुकर होण्यासाठी बोली भाषेतून शिक्षण देऊन वाचन कौशल्य वाढविण्यासाठी मी हाती घेतलेला उपक्रम खरंच फलदायी ठरला आहे.

**५) निसर्गाच्या सानिध्यात सहज शिक्षण :** गर्द निसर्गाच्या सानिध्यातील गोटूलरुपी मिनी शाळेत निसर्गातील साधनाचा उपयोग करुन बोली भाषेतून वाचन कौशल्य वाढवण्याचा प्रामाणिक प्रयत्न करतो आहे.

**६) शिक्षकाच्या स्वनिर्मित माडिया पाठय पुस्तकाची निर्मिती** : माडिया भाषेतील मराठी जुन्या अभ्यासक्रमातील मराठी बालभारती इ. १ लीचे पाठयपुस्तक व माडिया भाषेच्या उच्चारातील मराठी मुळाक्षरांची अंकलिपी निर्मिती गावातील माडिया मित्रांच्या मदतीने तयार केली.

- **<u>नवोपक्रमाचे महत्व</u> : -**

महाराष्ट्रात असंख्य शाळा आहेत. जिथे 'इमारती विना शाळा' आहेत. शाळा आहेत पण वर्ग खोल्या नाहीत अशा परिस्थितीत स्थानिक परिस्थिती लक्षात घेऊन वर्गासाठी पर्याय व्यवस्था करण्यापलीकडे आपल्या हाती दुसरा पर्याय नव्हता. विद्यार्थ्यांचे हित लक्षात घेऊन आपल्याला योग्य निर्णय घेवून त्यातून वाट काढावी लागते.

शाळेच्या इमारतीची दुरावस्था बघून मुलांच्या शिक्षणात खंड पडू नये म्हणून मी गोटूलमध्ये शाळा भरवून निसर्गातून सहज उपलब्ध होणाऱ्या कमी खर्चिक साधनांचा उपयोग करुन मुलांना माडिया बोली भाषेतून प्रमाण भाषेत अक्षर-शब्द-वाक्य ज्ञान वाढवून वाचन कौशल्य विकसित केले.

शिक्षणात माडिया भाषेची असलेली अडचण लक्षात घेऊन 'अक्षर-शब्द सेतू' खरंच आदिवासी माडिया मुलांसाठी फलदायी ठरले आहे. माडिया-मराठी भाषेचा सेतू बांधून अवघड वाटणारं मराठी अक्षर-शब्द विद्यार्थ्याला सोपे वाटायला लागले.

"**Nature is the most precious gift of God.**" गर्द निसर्गाच्या सानिध्यात राहत असल्यामुळे येथील ग्रामस्थांची निसर्गाविषयी अपार आस्था, प्रेम, आपुलकी आहे. निसर्गातून सहज उपलब्ध होणाऱ्या साधनापासून निर्माण केलेले विविधपूर्ण शैक्षणिक साधने विद्यार्थी मोठया आपुलकीने हाताळतात व त्यातून वाचन व इतर गोष्टी शिकतात. निसर्गाकडूनही मोकळया वातावरणात शिकता येते ही गोष्ट त्या मुलांना मनोमन समजले.

निसर्गातील झाडे मानवाला शुध्द ऑक्सिजन पुरवतात पण येथील झाडे ऑक्सिजन सोबत शब्द ही पुरवतात. गोटूलमधील रचलेल्या नानाविध वाचन उपक्रमामुळे माडिया भाषिक विद्यार्थ्यांना प्रमाण भाषेतून प्रत्यक्ष वाचन करायला शिकता आले.

शब्दांचे झाड, स्मृति फलक ताडांची झाडे बोलती झाली. निसर्गातून जमवलेल्या व त्यातून निर्माण केलेल्या कमी खर्चिक टिकाऊ शैक्षणिक साधनांचा विद्यार्थ्यांचे वाचन कौशल्य विकसित करण्यात खूप मोठा वाटा आहे.

विद्यार्थ्यांचे पुढील शिक्षण चांगले होण्यासाठी वाचन करता येणे आवश्यक आहे म्हणूनच प्रस्तुत नवोपक्रमाच्या माध्यमातून विविध उपक्रम राबवून विद्यार्थ्यांचे वाचन कौशल्य विकसित केले.

**या उपक्रमामुळे ....**

१) विद्यार्थ्यांच्या बोली भाषेतून प्रमाण भाषेत वाचन कौशल्याचा विकास होईल.

२) विद्यार्थ्यांना शिक्षणाविषयी आवड निर्माण होईल.

३) निसर्गाकडूनही आपल्याला शिकता येईल हे विद्यार्थ्यांना प्रकर्षाने जाणवेल.

४) शाळा व शिक्षण याबददल विद्यार्थ्यांच्या मनात असलेली भीती कमी होऊन विद्यार्थ्यांची उपस्थिती १०० टक्के राहील.

५) मुलांना ओपन स्कूलची अनुभूती मिळेल.

६) निपूण भारत अभियान अंतर्गत पायाभूत भाषा साक्षरता संदर्भाने विद्यार्थ्यांचे वाचन कौशल्य विकसित व्हावे आणि त्यांच्यामध्ये वाचन अभिरुची निर्माण व्हावी यासाठी सदर उपक्रम खूप उपयोगी ठरले आहे.

आदिवासी भागात अध्यापन करणाऱ्या सर्व शिक्षकांना हा नवोपक्रम निश्चितच उपयोगी ठरेल असा माझा विश्वास आहे.

**३) <u>नवोपक्रमाची उद्दिष्टे</u> : -**

प्रस्तुत नवोपक्रमाची काही उद्दिष्टे निश्चित आहेत ती पुढीलप्रमाणे....

१) विद्यार्थ्यांना वाचन करतांना येणाऱ्या समस्यांचा शोध घेणे.

२) वाचन कौशल्य विकसित करणे.

३) विद्यार्थ्यांना वाचन करता येण्यासाठी वाचन विषयक विविध उपक्रम राबविणे.

४) अध्ययन-अध्यापनात सहज उपलब्ध होणाऱ्या शैक्षणिक साधनांचा वापर करुन अध्ययन-अध्यापन प्रक्रिया कृतिशील करणे.

५) विद्यार्थ्यांची शाळेतील उपस्थिती वाढविणे.

४) <u>**नवोपक्रमाचे नियोजन**</u> :-

योग्य नियोजनावर कोणत्याही कार्याची यशस्विता अवलंबून असते म्हणून माझे नियोजन पुढीलप्रमाणे केले.

**I) उपक्रम पूर्व स्थितीचे निरीक्षण : -**

माझ्या शाळेतील १० विद्यार्थ्यापैकी फक्त एक दोन विद्यार्थी सोडता बाकीच्या सर्व विद्यार्थ्यांना मराठी शब्द-वाक्य वाचता येत नव्हती. अपरिचयाची मराठी भाषा व मराठी बोलता येत नसल्यामुळे अध्यापनाच्या वेळी अभ्यास गटातील चर्चेवेळी शाळा भेटीस आलेल्या नवीन व्यक्तीसोबत प्रश्नोत्तरे किंवा चर्चेत मुले सहभागी होत नव्हती. अध्ययन-अध्यापनातील विद्यार्थी-शिक्षक परिणामकारक आंतरक्रिया होत नव्हती. शाळेची इमारत अत्यंत धोकादायक असून त्यात विद्यार्थी बसवून वर्ग भरविणे घातक होते.

**II) संबंधित व्यक्तीशी चर्चा व तज्ञांशी चर्चा : -**

या समस्येबाबत सर्वप्रथम मी गट्टा केंद्राचे केंद्रप्रमुख श्री. बेडके सर यांच्याशी चर्चा केली. तसेच श्री. दिपक देवतळे सर, गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती एटापल्ली जि. गडचिरोली यांच्यासोबत मुलांच्या भाषिक सद्यस्थिती लक्षात आणून देऊन वाचन कौशल्य बाबत चर्चा केली असता असे निदर्शनात आले की स्थानिक माडिया बोली भाषेच्या प्राबल्यामुळे तसेच घरी असलेल्या माडिया भाषिक वातावरणामुळे मराठीतून वाचन करता येत नाही. मराठी अजिबात समजत नसल्यामुळे शाळेतील अध्ययन-अध्यापन प्रक्रियेत विद्यार्थी सहभागी होत नाही. त्यांना शिक्षण निरस वाटायचे. मुलांना अधिकाधिक मराठी भाषेतून श्रवणाची संधी मिळवून दिली पाहिजे. विविध उपक्रमाच्या माध्यमातून मुलांच्या शब्द संपत्तीत वाढ करु शकतो. वाचन कौशल्य वाढविण्यासाठी नानाविध वाचन उपक्रमाचे आयोजन करणे गरजेचे आहे. त्याव्दारे विद्यार्थ्यांच्या वाचन कौशल्य विकसित करता येते असे सुचविले. जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था गडचिरोली येथील अधिव्याख्याता श्रीमती वैशाली येगोलपवार मॅडम यांच्याशी वाचन कौशल्य विकसित करण्यासाठी कोणकोणते उपक्रम योजता येईल याबाबत चर्चा केली व विद्यार्थ्यांना माडिया बोली भाषेतून अध्यापन करुन मराठी विषयाकडे नेता येईल व काही प्रमाणात भाषिक खेळ व उपक्रमाचे आयोजन करुन मुलांना लेखन-वाचन शिकविता येईल असे सुचविले. आमचे क्षेत्रातील जि. प. सदस्य सैनूजी गोटा साहेब यांच्याशी शाळेच्या एकूण परिस्थिती तसेच मुलांच्या प्रगतीत अडसर ठरलेल्या भाषिक समस्येबाबत व यातून मार्ग कसा काढायचा याबाबत चर्चा करण्यात आली.

शाळेच्या इमारतीची दुरावस्था बघून पर्यायी व्यवस्था करुन अध्ययन-अध्यापनाची प्रक्रिया सुरु ठेवावी याबाबत मार्गदर्शन केले.

**III) आवश्यक साधनांची निर्मिती व वापर : -**

तज्ज्ञांशी चर्चा करुन हा नवोपक्रम सुरु करण्यापूर्वी विद्यार्थ्यांच्या वाचन कौशल्याचा विकास जाणून घेण्यासाठी २५ गुणांची पूर्व चाचणी तयार करण्यात आली. ८ उपक्रम राबविल्यानंतर विद्यार्थ्यांना आवर्तनाची गरज आहे किंवा नाही हे तपासून पाहण्यासाठी पदनिश्चयन श्रेणीची निर्मिती केली. नवोपक्रम किती प्रमाणात यशस्वी झाला आहे हे पडताळून पाहण्यासाठी अंतिम चाचणी तयार केली.

पूर्व चाचणी, पदनिश्चयन श्रेणी, अंतिम चाचणी तयार झाल्यानंतर तज्ञाव्दारे तपासून घेण्यात आली. विद्यार्थ्याचे वाचन कौशल्य वाढविण्यासाठी विविध साधनांचा उपयोग करुन नियोजन करण्यात आले. त्यासाठी पुढील गोष्टींचा, साधनांचा आधार घेण्यात आला. यात आदिवासी संस्कृतीचाही विचार करण्यात आला.



१) जंगलातील संजीवनी : जंगलातून आणलेल्या ताडाच्या झाडांच्या फांदयापासून व इतर नैसर्गिक साधनापासून विविध्यपूर्ण व वैशिष्ट्यपूर्ण साधने तयार केली.

२) ताडाच्या झाडाचा फळा म्हणून वापर : गोटूलमधील ताडीच्या बुंध्याला रंगवून फळा तयार करण्यात आला.

३) **स्मृतिफलक** : माडिया आदिवासी समाजात मृत व्यक्तींची आठवण म्हणून जमिनीत मोठा उभा दगड रोवतात. या दगडाबददल खूप आपूलकी, प्रेम असते. गाव पाटलाची मंजूरी घेऊन गोटूलमधील दगडाला फळयाचे रुप देण्यात आले. आदिवासीची मुले मोठया आस्थेने या दगडावरील अक्षर-शब्द पाहून वाचतात.



४) भाषिक खेळ यासाठी स्वयंअध्ययन शब्द पट्टया एकूण संख्या – ३०

५) व्दिभाषिक विविध चार्टस एकूण संख्या – १५

फळे, फुले, प्राणी, पक्षी, पालेभाज्या इ. व्दिभाषिक शब्द तयार केले.

६) माडिया भाषेतील उच्चारातील मराठी मुळाक्षरांची अंकलिपीची निर्मिती.

७) जुन्या अभ्यासक्रमातील इ. १ लीच्या माडिया भाषेत बालभारती पुस्तकाची निर्मिती.

८) संगीतमय सरावासाठी गोटूलमध्ये असलेल्या ढोलकीरुपी डबरीचा वापर.

९) विविध उपक्रमासाठी जंगलात उपलब्ध होणाऱ्या वस्तुंचा उपक्रमासाठी वापर केला.

१०) बालकांना हसत खेळत मनोरंजनात्मक कृतियुक्त व कौशल्ययुक्त संस्कारक्षम शिक्षण कसे देता येईल याचा विचार केला.

११) नवोपक्रमातील विविध उपक्रमासाठी लागणाऱ्या साहित्य बनविण्यासाठी लागणारे वस्तू उदा. फायबर शीट, कार्ड शीट पेपर, डींक, मार्कर पेन, विविध पेन्ट, रंगीत दगड, विविध झाडांची पाने, ताडाच्या झाडांच्या फांदया इ. गोष्टीची यादी तयार केली.

**IV) करावयाच्या कृतीचा क्रम : -**

नवोपक्रमाची प्रभावी यशस्वी होणे, वर्ग निवडणे, विद्यार्थ्यांना पूर्व कल्पना देणे, आवश्यक साहित्य आणणे, दिनांक व वेळ निश्चित करणे, मार्गदर्शन निश्चित करणे, वापरावयाचे तंत्रे निश्चित करणे, प्रत्यक्ष उपक्रम राबविणे व मूल्यमापनाव्दारे यशस्विता तपासणे हा कृतींचा क्रम निश्चित केला.

१) प्रथम शाळेत तसेच गृहभेटीव्दारे विद्यार्थ्यांचे भाषा विकास कौशल्याचे निरीक्षण केले.

२) उपक्रम पूर्व चाचणी विद्यार्थ्यांकडून सोडवून घेतली.

३) उपक्रम पूर्व चाचणीव्दारे निष्कर्ष काढले.

४) पालकांशी उपक्रमासंदर्भात संवाद साधला.

५) प्राथमिक स्तरावरील घ्यावयाच्या कृती निश्चित केल्या.


६) कृतीची अंमलबजावणी बालकासाठी वाचन कौशल्य वाढविण्यासाठी सोप्या असणाऱ्या उपक्रमाची यादी बनवली.

७) उपक्रमोत्तर चाचणी सोडवून घेतली.

८) उपक्रमोत्तर चाचणीव्दारे निष्कर्ष काढून घेतले.

**V) उपक्रमोत्तर स्थितीचे निरीक्षण : -**

सदर नवोपक्रम राबविल्यानंतर त्याचे खूप सकारात्मक परिणाम दिसू लागले. बोली भाषेतून शिक्षणामुळे विद्यार्थी अध्ययन-अध्यापन प्रकियेत मोठया आनंदाने सहभागी होऊ लागले. आपणही शिकू शकतो, चांगले वाचू शकतो असा आत्मविश्वास विद्यार्थ्यांमध्ये निर्माण झाला. विद्यार्थी मराठीतील अक्षर-शब्द-लहान लहान वाक्य वाचन करु लागली. मराठी भाषा समजू व बोलू लागली हेच नवोपक्रमाचे मोठे फलित आहे. वाचन विषयक विविध उपक्रमाव्दारे विद्यार्थ्यांना स्वयं-अध्ययनास प्रवृत्त करुन आवड निर्माण झाली. विद्यार्थ्यांची शाळेतील उपस्थिती १०० टक्के राहू लागली. आनंदाने व आवडीने गोटूल रुपी मिनी शाळेत येऊ लागली.




**VI) कार्यवाहीचे टप्पे (वेळापत्रक) : - "निसर्गाच्या सानिध्यात जाऊया, बोली भाषेतून प्रमाण भाषा शिकूया"** हा नवोपक्रम जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, वाळवी या शाळेत शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये शाळेतील विद्यार्थ्यांचा प्रमाण भाषेतील वाचन कौशल्य वाढविण्याकरीता राबविण्यात आला. या नवोपक्रमामध्ये इ. १ ली ते इ. ३ री चे १० विद्यार्थी सहभागी झाले होते. यासाठी खालील कृतींचा नवोपक्रमात समावेश करण्यात आला होता.

| अनु. क्र. | कालावधी | करावयाची कृती |
|---|---|---|
| १ | दि. १ जुलै ते दि. ११ जुलै | नवोपक्रम नियोजन, तज्ञांशी चर्चा, आवश्यक साधनांची निर्मिती |
| २ | दि. १२ जुलै | पूर्व चाचणी विद्यार्थी प्रतिसाद |
| ३ | दि. १३ जुलै ते १५ ऑक्टोबर | प्रत्यक्ष उपक्रम अंमलबजावणी |
| ४ | दि. १७ ऑक्टोबर | पदनिश्चयन श्रेणीव्दारे विद्यार्थी प्रतिसाद तपासणी |
| ५ | दि. १८ ऑक्टोबर | अंतिम चाचणी |
| ६ | दि. १९ ते २९ ऑक्टोबर | नवोपक्रम अहवाल लेखन |

● विद्यार्थ्यांची वाचन कौशल्ये वाढविण्यासाठी विकसित केलेल्या नाविन्यपूर्ण उपक्रमाची यादी ●

| अ. क्र. | उपक्रम | वापरण्याचे साहित्य | कृती | निकष |
|---|---|---|---|---|
| १ | चला अक्षरे ओळखू या | अक्षर कार्ड, बांबूची टोपली | टोपलीतील अक्षर कार्ड उचलून वाचन करायला लावणे. | अक्षर ज्ञान वाढविणे. |
| २ | मुळाक्षरांची सापशिडी | मुळाक्षरे, सापशिडीचा तक्ता, फासे, सोंगटया | विद्यार्थ्याला फासे टाकून सापशिडीतील मुळाक्षरांचे वाचन करायला लावणे. | मुळाक्षरे वाचन सराव. |
| ३ | ताडी पत्र कोणाचे ? | ताड झाडांच्या फांदया, मार्कर पेन | विद्यार्थ्यांना ताड पत्रावरील मुळाक्षरे, चौदाखडी वाचन करण्यास सांगणे. | चौदाखडीची ओळख. |
| ४ | शब्दनिर्मिती करु या. | अक्षर कार्ड | शब्द तयार करणे. | शब्द संपत्ती वाढविणे. |
| ५ | उच्चारातील फरक ओळखू या. | अक्षर-शब्द कार्ड | उच्चार भेद असलेल्या सर्वप्रथम मुळाक्षरे नंतर शब्दाचे जोडपट्ट्या वाचन घेणे. | उच्चार भेद समजाविणे व वाचन सराव. |
| ६ | टोपलीत दडलयं काय ? | शब्द कार्ड, | विद्यार्थ्यांना टोपलीतील शब्द उचलायला लावून वाचन घेणे. | वाचन सराव |
| ७ | शब्दांचे झाड कोणाचे ? | शब्दपट्ट्या | झाडावर लटकविलेले शब्द वाचन करायला लावणे. | वाचन सराव |
| ८ | शब्द वाक्यपट्ट्या वाचू या | शब्दपट्ट्या, वाक्य पट्ट्या | शब्दपट्ट्याचे वाचन करणे. | शब्द संपत्ती वाढविणे. |
| ९ | स्मृतीफलकावरील शब्द डोंगर वाचू या. | स्मृती फलक व खडू | स्मृतीफलकावरील शब्द डोंगराचे वाचन करणे. | वाचन सराव |
| १० | लपलेल्यांना शोधा. | शब्दपट्ट्या | गाळलेली अक्षरे शोधणे | शब्द संपत्ती वाढविणे. |
| ११ | झाडांची पाने वाचू या | झाडांची पाने, फायबर शीट, परमनंट मार्कर पेन | झाडाच्या पानांवरील शब्दांचे वाचन करणे. | शब्द संपत्ती वाढविणे. |

**VII) उपक्रमासाठी इतरांची मदत : -**

उपक्रमासंदर्भात गडचिरोली जिल्हयाचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. कुमार आर्शीवाद साहेब, व शिक्षणाधिकारी मा. नाकाडे साहेब, श्रीमती वैशाली येगोलपवार अधिव्याख्याता जि. शि. व प्र. शि. संस्था, गडचिरोली यांची बहुमोलाची मदत झाली. गटविकास अधिकारी श्री. एम. एस. माहोर साहेब, गटशिक्षणाधिकारी श्री. दिपक देवतळे साहेब, शिक्षण विस्तार अधिकारी श्री. विनायक पुरकलवार सर, गट्टा केंद्राचे केंद्रप्रमुख श्री. बेडके सर, जि. प. सदस्य श्री. सैनूजी गोटा, शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य, माता पालक संघ व सर्व पालक यांचे सहकार्य लाभले.

**VIII) उपक्रमासाठी सादर करावयाची पुरावे : -**

सदर उपक्रम राबविल्याचे पुरावे खालीलप्रमाणे आहेत.

१) सदर नवोपक्रमातील उपक्रमाचे व्हिडीओ युटयूब वर प्रसारित केली आहे. त्याची लिंक खाली दिलेली आहे.

https://youtu.be/0y3ySCPFh8s

https://youtu.be/LML4ZJ_PWJk

https://youtu.be/8AEjhwy7Oxo

https://youtu.be/h-io2m7V1v4

https://youtu.be/pqSWVJNsVUs

https://youtu.be/a44a2rHykP8

https://youtu.be/83T-CClTgkI

https://youtu.be/mrd2drrDwdY

२) सदर नवोपक्रमाची वर्तमान पत्र व टीव्ही चॅनेलने दखल घेतली. त्याची लिंक खाली दिलेली आहे.

http://epaper.lokmat.com/articlepage.php?articleid=LOK_PULK_20220921_3_10

http://product.sakaalmedia.com/portal/SM.aspx?ID=406610

https://www.facebook.com/1487663018223526/posts/pfbid02F4rGQt72QPqabkucuuM8RYYt2Px3LsMX7bnHTXmKPPGC147at6V4juV1uWG6Lpk6l/

लोकमत

# बांबूच्या झाल्या भिंती, अन् ताडीचे झाड झाले फळा

## गडचिरोलीच्या अतिदुर्गम गावात शिक्षकाच्या कल्पकतेतून शिक्षणाचे धडे

रवी रामगुंडेवार
लोकमत न्यूज नेटवर्क

**एटापल्ली (गडचिरोली) :** गडचिरोली जिल्ह्यातल्या एटापल्ली तालुक्यात काही शाळांच्या इमारती अनेक वर्षांपासून विद्यार्थ्यांना बसण्यायोग्य राहिलेल्या नाहीत. अशा जीर्णावस्थेतील धोकादायक इमारतींपासून विद्यार्थ्यांना दूर ठेवून निसर्गाच्या सान्निध्यात शिक्षणाचे धडे गिरवण्याचा नावीन्यपूर्ण प्रयोग या तालुक्यातील वाळवी या गावात सुरू आहे. त्यासाठी बांबूपासून बनविलेल्या भिंती आणि ताडीच्या झाडाच्या बुंध्याचा फळ्यासारखा वापर करून दुर्गम भागातील विद्यार्थ्यांना शिक्षण देण्यासाठी आटापिटा केला जात आहे.

गट्टा केंद्रांतर्गत वाळवी या दुर्गम गावात जिल्हा परिषदेची एकशिक्षकी शाळा आहे. या छोट्या गावात आदिवासींमधील माडिया जमातीचे जेमतेम ३० ते ४० कुटुंबं वास्तव्यास आहेत. चारही बाजुंनी घनदाट जंगल, गावात जायचे असल्यास पायवाटेने जाण्याशिवाय पर्याय नाही. पावसाळ्यात तर वाटेत पडणाऱ्या नाल्यांच्या पाण्यातून वाट काढत या गावात पोहोचणे म्हणजे जिवाची कसरतच. अशातही वाळवी गावात जिल्हा परिषदेची वर्ग १ ते ४ पर्यंतची शाळा भरते. पण भौतिक सुविधा नसतानाही शिक्षक, गावकऱ्यांनी शिक्षणाचे महत्त्व ओळखून अडचणींवर मात केली आहे.

### शाळेचे नवीन रूप भावले

ताडीच्या झाडांपासून तयार केलेली वैविध्यपूर्ण, विनाखर्चाची पण टिकाऊ शैक्षणिक साधने गोट्टूलमध्ये लावण्यात आली. शब्दांचे झाड, स्मृतिशेष फलक गोट्टूलची शोभा वाढविण्याबरोबर विद्यार्थ्यांचे भाषिक कौशल्य वाढवितात. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा यासाठी शिक्षक श्रीकांत काटेलवार सातत्याने प्रयत्न करताना दिसतात. त्यामुळे ही मिनी शाळा पंचक्रोशीत कौतुकाचा विषय ठरत आहे.

### मुलांचे स्थलांतर थांबविले

सुरुवातीला या गावातील शाळेची पटसंख्या केवळ १ होती. आज १० विद्यार्थी गोट्टूलमध्ये बोलीभाषेतून आनंददायी शिक्षण घेत आहेत. आदिवासींची बोलीभाषा माडिया ही त्यांच्या शिक्षणात मोठी अडचण होती. जंगलात भिरभिरणारी ही मुले एका जागी स्थिर बसणारी नाहीत, हे शिक्षकांनी जाणून स्थानिक माडिया बोलीभाषेतून अध्यापन सुरु केले. सर्वप्रथम माडिया भाषेतून शिकवून नंतर मराठी भाषेकडे नेण्याचा त्यांचा प्रवास सुरु झाला.



### जीर्ण इमारतीवर शोधला पर्याय

शाळेची इमारत अत्यंत धोकादायक. पावसाचे पाणी गळणारी, कधीही उन्मळून पडेल याचा नेम नसणाऱ्या भिंती आणि छत. त्यामुळे अशा इमारतीत विद्यार्थ्यांना घेऊन वर्ग भरविणे जिकिरीचे असल्याचे ओळखून वाळवीचे ग्रामस्थ आणि मुख्याध्यापक श्रीकांत काटेलवार यांनी गावातील 'गोट्टूल' मध्ये शाळा भरविण्याचे ठरविले. गावातील सांस्कृतिक कार्यक्रम घेण्याचे हे छोटेसे समाजभवन म्हणजेच गोटुल. पण ते सुद्धा व्यवस्थित नव्हते. मग गावातल्या प्रत्येक कुटुंबातील सदस्याने सहभाग देत गोट्टूलरुपी भवनाला सजवून शाळेचे रूप दिले.

सकाळ

# 'ते' देतात निसर्ग सानिध्यात शिक्षण

## अतिदुर्गम वाळवी गावात अनोखा उपक्रम; जिल्हा परिषदेची गोटूलमधील मिनी शाळेचे कौतुक

प्रकाश दुर्गे : सकाळ वृत्तसेवा

**अहेरी, ता. २० : गडचिरोली जिल्ह्यातील अतिशय दुर्गम, दुर्लक्षित नक्षल प्रभावित एटापल्ली तालुक्यातील वाळवी हे छोटेसे गाव सध्या सर्वत्र चर्चेचा आणि कौतुकाचा विषय ठरत आहे. या गावातील जिल्हा परिषदेतील गोटुलच्या शाळेत विद्यार्थ्यांना मुख्याध्यापक श्रीकांत काटेलवार व त्यांचे सहकारी निसर्गाच्या सानिध्यात सहज सोपे शिक्षण देत आहेत.**

चारही बाजूंनी घनदाट जंगलांनी व्यापलेल्या या गावात स्वातंत्र्याच्या ७५ वर्षांनंतरही विकासाची गंगा पोहचली नाही. गावात अजूनही रस्ता नाही. पायवाटेने गावात प्रवेश करावा लागतो. पावसाळ्यात वाळवी गावाला पोहचणे अशक्यच असते. चारही डोंगराच्या कुशीत उगम पावणारे नदी, नाले पावसाळ्यात दुथडी भरून वाहतात. त्यामुळे येथे पावसाळ्यात जगाशी संपर्क तुटतो. येथील माडिया वस्तीवर जिल्हा परिषदेची १ ते ४ वर्ग असलेली एक शिक्षकी शाळा आहे.

शाळेची इमारत अत्यंत धोकादायक, गळकी व जीर्ण असून शेवटच्या घटका मोजत आहे. ही इमारत कधी कोसळेल याचा काही नेम नाही. अशा इमारतीत विद्यार्थ्यांना घेऊन वर्ग भरविणे जिकरीचे आहे हे ओळखून वाळवी ग्रामस्थ आणि मुख्याध्यापक श्रीकांत काटेलवार यांनी गोटूलमध्ये शाळा भरविण्याचे ठरविले. गावातील सर्वांनी पंडूम सण साजरा करीत प्रत्येक कुटुंबातील प्रत्येकाचा सहभाग घेत नव्या दिमाखात गोटूल रूपी मिनी शाळेची उभारणी केली. आता येथे दहा विद्यार्थी गोटूलमध्ये बोलीभाषेतून आनंददायी शिक्षण घेत आहेत. आदिवासींची बोलीभाषा माडिया असून हीच त्यांच्या शिक्षणात मोठी अडचण होती.

जंगलभर भिरभिरणारी ही आदिवासी मुले एका जागी स्थिर बसणारी नाहीत. हे शिक्षकांनी जाणून स्थानिक माडिया बोलीभाषेतून अध्यापन सुरू केले. माडिया भाषिक विद्यार्थ्यांना सर्वप्रथम माडिया भाषेतून शिकवून नंतर मराठी भाषेकडे नेण्याचा प्रवास सुरू झाला.

माडिया भाषिक मराठी बालभारती पाठ्यपुस्तक आणि माडिया भाषेतील उच्चारातील अंकलिपीची निर्मिती एक-दोन शिक्षकांनी मिळून तयार केली. त्याचाही वापर फलदायी ठरत आहे. गोटूलमधील नानाविध उपक्रमांमुळे माडिया भाषिक विद्यार्थ्यांना शिकणे सुलभ झाले. त्यांनी ताडाच्या झाडांपासून विना खर्चिक पण टिकाऊ शैक्षणिक साधने गोटूलमध्ये तयार केली. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा यासाठी येथील मुख्याध्यापक श्रीकांत काटेलवार अविरत प्रयत्न करतात. या मिनी शाळेचे कौतुक करण्यात येत आहे. एटापल्ली पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी दीपक देवतळे, बिट शिक्षणविस्तार अधिकारी विनायक पुरकलवार, केंद्रप्रमुख बेडके या शाळेसाठी सहकार्य करत आहेत.

**मिनी शाळेची वैशिष्ट्ये**

नैसर्गिक साधनांपासून तयार केलेली विविधपूर्ण शैक्षणिक साधने, पाषाणाचा स्मृति फलक, ताडाच्या झाडाचा फळा म्हणून उपयोग, मोहाच्या झाडाला शब्दांच्या झाडाचे दिलेले रूप, ताडाच्या फांद्यांपासून बाराखडी, माडिया भाषिक बालभारती पुस्तकांची व माडिया उच्चारातील अंकलिपी, अक्षर-शब्द सेतु, बोलीभाषेतून शिक्षण ही या शाळेची काही खास वैशिष्ट्ये आहेत.



अहेरी : कार्यानुभव विषयाचे प्रशिक्षण देताना मुख्याध्यापक काटेलवार.

**"शाळेत कला, कार्यानुभव व शारीरिक शिक्षण या विषयांचे विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. विद्यार्थ्यांच्या कला गुणांना विकसित करणारे शिक्षण देऊन मुलांमध्ये शाळेची आवड निर्माण केली आहे. त्यांना त्यांच्याच बोलीभाषेतून शिक्षण देण्याचा प्रयत्न केला. रानावनात, शेतशिवारात भटकंती करणारी मुले आता शाळेत रमत आहेत.**
**– श्रीकांत काटलेवार,** मुख्याध्यापक, जिल्हा परिषद शाळा, वाळवी

Nagpur, Gadchiroli-Today
21/09/2022 Page No. 4

# चंद्रपुर-गड़चिरोली भास्कर

**15 ग्रापं में ...**

गड़चिरोली | आदिवासी बहुल और नक्सलग्रस्त गड़चिरोली जिले में शुद्ध पेयजल नहीं मिलने के कारण कई तरह की बीमारियां बढ़ने लगी है। खासकर बारिश के दिनों में ... जैसी बीमारियां भयावह रूप धारण करती है।

पृष्ठ 18

दैनिक भास्कर | नागपुर | सोमवार, 19 सितंबर 2022 | bhaskarhindi.com

## ग्रामीणों के सहयोग से शिक्षा की मुख्य धारा से जुड़ रहे विद्यार्थी

# शाला की इमारत हुई जर्जर तो गोटुल भूमि में शुरू कर दी मिनी शाला

**» एटापल्ली के सुदूर वाड़वी गांव में प्रधानाचार्य काटेलवार का सराहनीय प्रयास**

संवाददाता | एटापल्ली (गड़चिरोली).

शिक्षा सभी का मूलभूत अधिकार है। लेकिन गड़चिरोली जिले के अधिकांश सुदूर इलाकों में जिला परिषद की लापरवाहीपूर्ण कार्यप्रणाली के कारण शाला की इमारत जीर्ण होने से विद्यार्थियों का लगातार शैक्षणिक नुकसान हो रहा है। ऐसी स्थिति में भी कुछ शिक्षक ग्रामीणों की मदद से मौजूद सुविधाओं का लाभ उठाकर विद्यार्थियों को शिक्षा की मुख्य धारा से जोड़ने का कार्य कर रहे हैं। ऐसा ही एक मामला तहसील के अतिदुर्गम और पहाड़ी क्षेत्र में बसे ग्राम वाड़वी में देखने को मिल है। गांव की जिला परिषद शाला की इमारत पूरी तरह जर्जर अवस्था में होने से ग्रामीणों ने गांव के गोटुल भवन को मिनी शाला का रूप दे दिया है। शाला के प्रधानाध्यापक और एकमात्र शिक्षक श्रीकांत काटेलवार अब इसी मिनी स्कूल में बच्चों को पढ़ाने का सराहनीय कार्य कर रहे हैं। वाड़वी गांव में जिप के शिक्षा विभाग ने प्राथमिक शाला आरंभ की है। वर्तमान में शाला की इमारत पूरी तरह जीर्ण अवस्था में है। बारिश शुरू होते ही शाला की छत टपकने लगती है। किसी भी समय यह इमारत ढह सकती है। इसी कारण शाला के एकमात्र शिक्षक और प्रधानाध्यापक काटेलवार ने विभाग को पत्र लिखकर शाला इमारत की मरम्मत करने की मांग की। इसके लिए शाला प्रबंधन समिति ने प्रस्ताव भी पारित किया।



बावजूद इसके शाला मरम्मत का कार्य शुरू नहीं किया गया। इस बीच विद्यार्थियों का लगातार हो रहे शैक्षणिक नुकसान को रोकने के लिए प्रधानाध्यापक काटेलवार ने वाड़वी गांव के नागरिकों के साथ चर्चा की। इस समय गांव की शाला गोटूल भवन में शुरू करने का फैसला लिया गया। गोटूल भवन में शाला का रूप प्रदान करने के लिए पंडुम त्योहार मनाते हुए लोगों से चंदा इकट्ठा किया गया। इसी चंदे के पैसे से गोटूल भवन की इस मिनी शाला को शाला का रूप प्रदान किया गया।

### अब आदिवासी विद्यार्थी मराठी समझने और बोलने लगे हैं

वर्तमान में इस शाला में कक्षा पहली से चौथी के कुल 10 विद्यार्थी शिक्षारत हैं। यह इलाका पूरी तरह आदिवासी बहुल होकर लोगों की बोलीभाषा भी गोंडी और माड़िया है। इस कारण यहाँ विद्यार्थियों को शिक्षा देने के लिए शिक्षक काटेलवार ने भी यह भाषा सीख ली। माड़िया भाषिक मराठी बाराखड़ी पाठ्यपुस्तक और माड़िया भाषा की अंकलिपि की मदद से शिक्षक ने विद्यार्थियों को पढ़ाना शुरू किया है। शिक्षक काटेलवार की इस शिक्षा को ग्रहण करते-करते अब आदिवासी विद्यार्थी मराठी भाषा को समझने और बोलने भी लगे हैं। गोटूल भवन की इस नई मिनी शाला को शाला का रूप प्रदान करने एटापल्ली पंस के गुटशिक्षाधिकारी दीपक देवतले और बिट शिक्षा विस्तार अधिकारी ... केंद्र प्रमुख ... ने भी सहयोग प्रदान किया। वर्तमान में प्रधानाध्यापक और शिक्षक काटेलवार के इस प्रयास की सभी स्तरों से सराहना की जा रही है।

**लोकमत**

# शिक्षणासाठी धडपड, बांबूच्या झाल्या भिंती, झाडाचा झाला फळा !



नैसर्गिक वातावरणात शिक्षणाचे धडे गिरवताना विद्यार्थी.

**लोकमत विशेष**

**रवी रामगुंडेवार**
लोकमत न्यूज नेटवर्क

**एटापल्ली (जि. गडचिरोली) :** शाळांच्या इमारती विद्यार्थ्यांना बसण्यायोग्य नाहीत. जीर्ण, धोकादायक इमारतींमुळे विद्यार्थ्यांचे शिक्षण वंचित राहू नये म्हणून नवा प्रयोग एटापल्ली तालुक्यातील वाळवी गावात सुरू आहे. बांबूपासून बनविलेल्या भिंती व ताडीच्या झाडाच्या बुंध्याचा फळ्यासारखा वापर करून विद्यार्थ्यांना शिक्षण देण्यासाठी आटापिटा सुरू आहे.

गट्टा केंद्रांतर्गत वाळवी या दुर्गम गावात जिल्हा परिषदेची एकशिक्षकी शाळा आहे. या छोट्या गावात आदिवासींमधील माडिया जमातीची जेमतेम ३० ते ४० कुटुंबं आहेत. चारही बाजूंनी घनदाट जंगल. गावात जायला पायवाट हाच पर्याय. पावसाळ्यात तर पाण्यातून वाट काढत गावात पोहोचणे म्हणजे जीवाची कसरतच. अशातही गावात वर्ग १ ते ४ पर्यंतची शाळा भरते; पण भौतिक सुविधा नसतानाही शिक्षक, गावकऱ्यांनी शिक्षणाचे महत्त्व ओळखून अडचणींवर मात केली आहे.

## जीर्ण इमारतीवर शोधला पर्याय

धोकादायक इमारतीत विद्यार्थ्यांचे वर्ग भरविणे जिकिरीचे. हे ओळखून वाळवीचे ग्रामस्थ आणि मुख्याध्यापक श्रीकांत काटेलवार यांनी गावातील 'गोटूल'मध्ये शाळा भरविण्याचे ठरविले. गावातील सांस्कृतिक कार्यक्रम घेण्याचे हे छोटेसे समाजभवन म्हणजेच गोटूल. गावकऱ्यांनी गोटूलरुपी भवनाला सजवून शाळेचे रूप दिले.

## नवीन रूप भावले

ताडीच्या झाडांपासून तयार केलेली वैविध्यपूर्ण, विनाखर्चाची पण टिकाऊ शैक्षणिक साधने गोटूलमध्ये लावण्यात आली. शब्दांचे झाड, स्मृतिशेष फलक गोटूलची शोभा वाढविण्याबरोबर विद्यार्थ्यांचे भाषिक कौशल्य वाढवितात. ही मिनी शाळा पंचक्रोशीत कौतुकाचा विषय ठरत आहे.

Nashik Main
Page No. 3 Sep 21, 2022
Powered by: erelego.com

http://epaper.lokmat.com/articlepage.php?articleid=LOK_NSLK_20220921_3_2

३) स्वनिर्मित माडिया भाषेतील मराठी पाठपुस्तकाची व माडिया भाषेच्या उच्चारातील मराठी मुळाक्षरांच्या अंकलिपीची लिंक खाली दिली आहे.

https://drive.google.com/file/d/1wA0YkvvYJqUWoyllY24yRlsoVnhKJVxkl/view?usp=sharing

https://drive.google.com/file/d/1MgD3FK7RRaJ760KpXr9VPbYigYpdSGum/view?usp=share_link

४) निसर्ग सानिध्यातील गोटूलमधील शाळेत विविध्यपूर्ण वाचन उपक्रमात सहभागी होतांना विद्यार्थी शिक्षक कृतीचे निवडक फोटो.





छोटया मुलांना खेळाची आवड असते त्यातून मुले सहज शिकतील. वरील गोष्टीचा विचार करुन शैक्षणिक खेळांची निवड केली. हे सर्व करतांना मुलांच्या वयाचा विचार प्रकर्षाने ठेवला.

- ❋ चला अक्षरांचे-शब्दांचे झाड वाचू या.
- ❋ मुळाक्षरांची सापशिडी
- ❋ ताड पत्र वाचू या.
- ❋ टोपलीत दडलयं काय ?

निसर्गातील या शाळेविषयी अधिकाऱ्यांचे, पदाधिकाऱ्यांचे, शिक्षण प्रेमी व पालकांचे अभिप्राय. प्रस्तुत उपक्रमासाठी शाळेतील विद्यार्थ्यांचे एकत्रित पूर्व व उत्तर चाचणी निकाल याचे शेकडा प्रमाण व त्यातील फरकावरुन उपक्रमाची यशस्विता मांडण्याचे ठरविले आहे. सोबत शिक्षक विद्यार्थ्यांचे फोटो व व्हिडीओ सादर करण्याचे ठरविले आहे.

**५) <u>नवोपक्रमाची कार्यपध्दती</u> : -**

**I) पूर्व स्थितीचे निरीक्षण व त्यांच्या नोंदी : -** माझ्या शाळेच्या गावात माडिया भाषा प्रामुख्याने बोलली जाते. गावात कुणालाच मराठी समजत नाही वा बोलता येत नाही. विद्यार्थ्यांच्या घरी माडिया भाषा बोलली जाते. त्यामुळे विद्यार्थ्यांना शिकविण्यात येणारी मराठी भाषा अजिबात समजत नव्हती. मराठी भाषा समजत वा बोलता येत नसल्यामुळे अध्ययन-अध्यापनाच्या वेळी मुले सहभागी होत नव्हती. शिक्षकाने विद्यार्थ्यांशी मराठीतून संवाद साधल्यानंतर विद्यार्थी काहीच प्रतिसाद द्यायचे नाही. मराठी भाषा समजत नसल्यामुळे विद्यार्थ्यांना मराठी विषयाबद्दल भीती वाटायची त्यामुळे विद्यार्थ्यांची शाळेतील उपस्थिती खूपच कमी राहायची. शाळा व शिक्षकाबद्दल आपूलकी वाटायची नाही. सुरुवातीला पालक ही विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीसाठी प्रयत्नशील नव्हते. शिक्षकाला विद्यार्थ्यांना मराठी भाषेतून शिकविणे म्हणजे पालथ्या घागरीवर पाणी टाकल्याचा प्रकार समजून आला. गावात मराठी भाषेला पोषक वातावरण नव्हते. विद्यार्थ्यांमध्ये असणाऱ्या पूर्व ज्ञानाची स्थिती तपासण्यासाठी घेण्यात आलेल्या पूर्व चाचणीचे मूल्यमापन करण्यासाठी माझ्या शाळेतील विद्यार्थ्यांना वाचन किती प्रमाणात येते हे तपासण्यासाठी पूर्व चाचणी घेतली.

**पूर्व चाचणीचे मूल्यमापन....**

| अ. क्र. | विद्यार्थ्यांचे नाव | इयत्ता | २५ पैकी मिळालेले गूण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १ | आयुष सोमलाल लकडा | इ. १ ली | ३ | १२% |
| २ | प्रिरींस जगेश्वर तिग्गा | इ. १ ली | ४ | १६% |
| ३ | अनुजा अजित लकडा | इ. १ ली | ५ | २०% |
| ४ | प्रियंका मनू उईके | इ. १ ली | ४ | १६% |
| ५ | रेश्मा गिसू आतलामी | इ. १ ली | ३ | १२% |
| ६ | चांदणी बिरजू आतलामी | इ. २ री | ६ | २४% |
| ७ | खुशी मधूकर आतलामी | इ. २ री | ५ | २०% |
| ८ | परमेश्वर जवाहिर एक्का | इ. २ री | ४ | १६% |
| ९ | रोशन किसनू लकडा | इ. २ री | ४ | १६% |
| १० | करुणा गिसू आतलामी | इ. ३ री | ६ | २४% |

**II) कार्यवाही दरम्यान केलेली निरीक्षणे व माहिती संकलन : -** शाळेची धोकादायक इमारत बघून शाळेलगत असलेल्या गोटूलमध्ये शाळा अभ्यासवर्ग सुरु केले. बोलीभाषेतून शिक्षण दिले जात असल्यामुळे विद्यार्थ्यांना शाळेविषयी आपुलकी वाटायला लागली. त्यामुळे मुले शाळेत दररोज येऊ लागली. भाषेच्या अध्ययन-अध्यापन आंतरक्रियेत विद्यार्थी आनंदाने सहभागी होऊ लागली. प्रमाण भाषेतील अक्षर-शब्द विद्यार्थ्यांना ओळखीचा वाटू लागली. यात द्विभाषिक पुस्तकांची खूप मदत झाली. आपणही मराठीतून बोलू शकतो, वाचू शकतो असा आत्मविश्वास विद्यार्थ्यांमध्ये निर्माण झाला. मुले बोलती झाली. संगीतमय साधनांचा अध्यापनात वापर केल्यामुळे विद्यार्थी अधिक उत्साही बनले. वाचन कौशल्य विकासासाठी योजलेले विविध उपक्रमात विद्यार्थी सक्रीय सहभागी व्हायचे. अवघड व नवीन वाटणारे अक्षर शब्द आता ओळखीचे वाटू लागले. आदिवासी माडिया संस्कृतीला धरुन योजलेले काही वाचन उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना व पालकांना शाळा व शिक्षकाविषयी विशेष आपूलकी वाटायला लागली.

नवोपक्रमातील वाचन उपक्रमाचे आयोजन करतांना पालकांचा सहभाग वाढला. पालकांच्या मदतीने नानाविध, द्विभाषिक चार्ट, नैसर्गिक घटकांपासून शैक्षणिक साहित्य बनविणे सुकर झाले. **"निसर्गाच्या सानिध्यात जाऊया, बोली भाषेतून प्रमाण भाषा शिकूया"** या नवोपक्रमासंदर्भातील व्हिडीओची लिंक https://youtu.be/0y3ySCPFh8s

**III) उपक्रम पूर्ण झाल्यावर केलेली निरीक्षणे व त्यांच्या नोंदी : -**

विद्यार्थ्यांना उपक्रम पूर्ण झाल्यावर आपण एक अशक्यप्राय वाटणारी गोष्ट पूर्ण केली याची अनुभूती आली. कारण मराठी भाषेतील शब्द-वाक्य वाचन करणे ही विद्यार्थ्यांच्या दृष्टीकोनातून अत्यंत कठीण समजली जाणारी बाब आपण स्वत: करु शकतो हे त्यांच्या लक्षात आले. विद्यार्थ्यांच्या मनामध्ये मराठी भाषेची असलेली भीती कमी झाली. विद्यार्थी प्रमाण भाषेतील अक्षर-शब्द-लहान लहान वाक्य वाचू लागली. विद्यार्थ्यांच्या मनामध्ये आत्मविश्वास निर्माण झाला.

आपण निसर्गातील घटकांच्या मदतीने अनेक गोष्टी शिकू शकतो. इतरांपेक्षा आपल्याला वेगळे ज्ञान मिळाले तसेच आपणही प्रमाण भाषेत बोलू व वाचू शकतो याचा आनंद विद्यार्थ्यांना मिळाला. मराठी भाषेत बोलणारे व वाचणारे पाल्य बघून पालकांना शाळा व शिक्षकाविषयी अभिमान वाटायला लागला. उपक्रम पूर्ण झाल्यावर घेण्यात आलेल्या उत्तर चाचणीमधील मिळालेल्या गुण उपक्रमाच्या यशस्वितेचा आलेख दर्शवितो. आता मी मराठीतून वाचू शकतो असे मनोमन विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण झाला.

**उपक्रम पूर्ण झाल्यावर घेण्यात आलेल्या उत्तर चाचणीचे मूल्यमापन......**

| अ. क्र. | विद्यार्थ्यांचे नाव | इयत्ता | २५ पैकी मिळालेले गुण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १ | आयुष सोमलाल लकडा | इ. १ ली | १६ | ६४% |
| २ | प्रिरींस जगेश्वर तिग्गा | इ. १ ली | १५ | ६०% |
| ३ | अनुजा अजित लकडा | इ. १ ली | १७ | ६८% |
| ४ | प्रियंका मनू उईके | इ. १ ली | १६ | ६४% |
| ५ | रेश्मा गिसू आतलामी | इ. १ ली | १४ | ५६% |
| ६ | चांदणी बिरजू आतलामी | इ. २ री | २० | ८०% |
| ७ | खुशी मधूकर आतलामी | इ. २ री | १८ | ७२% |
| ८ | परमेश्वर जवाहिर एक्का | इ. २ री | १८ | ७२% |
| ९ | रोशन किसनू लकडा | इ. २ री | १७ | ६८% |
| १० | करुणा गिसू आतलामी | इ. ३ री | २१ | ८४% |

उत्तर चाचणीतील गुणावरुन लक्षात येते की, हा उपक्रम विद्यार्थ्यांच्या प्रमाण भाषेतील वाचन कौशल्याच्या विकासासाठी उपयुक्त ठरला आहे आणि यामुळे भाषा विषयातील कौशल्याच्या विकासाला हातभार लागणार आहे. सुरुवातीला शाळेची पटसंख्या फक्त १ होती परंतु बोली भाषेतून शिक्षण, शाळेची पर्यायी व्यवस्था गोटूलमध्ये केल्यामुळे शाळेची पटसंख्या १० झाली. शाळेची उपस्थिती १०० टक्के राहते.

निसर्गाच्या सानिध्यातील गोटूलरुपी मिनी शाळेची किर्ती दुरवर पसरली. शाळेची धोकादायक इमारत लक्षात घेऊन गोटूल मध्ये केलेली पर्यायी व्यवस्था व त्यातील बोली भाषेतून शिक्षण त्याअनुषंगाने रचलेल्या उपक्रमाची चर्चा सर्वदूर जिल्हयासह महाराष्ट्रात पसरली. या उपक्रमांची नोंद सर्वच वर्तमान पत्रे व टी. व्ही. न्युज यांनी घेतली. गोटूलमधील मिनी शाळेची सर्वत्र कौतूक झाले. ही गोष्ट ग्रामस्थांना व शिक्षकांना सुखावणारी होती. या उपक्रमांबाबत सर्व पालकांचा दृष्टीकोन सकारात्मक बनला. शिक्षण प्रेमी, अधिकारी, राजकीय मंडळीनी निसर्ग सानिध्यातील गोटूलमधील मिनी शाळेला व त्यातील चाललेल्या बोली भाषेतून शिक्षण उपक्रमाला भेटी दिल्या. सर्वांनी कौतुकाची थाप दिली.

**IV) कार्यवाही करतांना आलेल्या अडचणी : -**

नक्कीच हा उपक्रम राबवितांना मोठया प्रमाणात अडचणींना सामोरे जावे लागले.

१) सुरुवातीला आमची मुले शिकत नाही, वाचन येत नाही, शाळेतील धोकादायक इमारतीत मुलांना कसे पाठवायचे ? असा सूर गावातील पालकांमधून येत होता. पण माझ्या सतत संपर्काने गावातील पालकांचा सहयोग मिळत गेला. आता गोटूलमध्ये शाळा सुरु झाल्यामुळे मुले दररोज येत आहेत आणि बोली भाषेतून आनंददायी शिक्षण घेत आहेत. याचाही त्यांना आनंद होत आहे. आता अडचण नाही.

२) कोरोना महामारीमुळे जवळपास २ वर्षे शाळा बंद असल्यामुळे विद्यार्थ्यांची गुणवत्ता खूपच नगण्य होती. या प्रदीर्घ काळात विद्यार्थ्यांचा शिक्षणात खंड पडल्यामुळे शाळा सुरु झाल्यानंतर मात्र त्या विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढीसाठी अथक प्रयत्न करावे लागले. वाचन उपक्रम राबवितांना सदर विद्यार्थी सक्रीय होऊ लागली. यासाठी उपक्रम कर्त्याला अधिकची मेहनत घ्यावी लागली.

३) उपक्रमाची कार्यवाही करतांना सुरुवातीला काही पालक मराठी भाषा समजत नसल्यामुळे बघ्याची भूमिका घेत होती. उपक्रमात सक्रिय सहभाग नोंदवत नव्हती. पण कालांतराने शिक्षकावरील विश्वास वाढून पालकांचा सहभाग वाढला.

४) उपक्रम योजतांना लागणारे साधन सहज उपलब्ध होत नव्हते.

५) गावातील पालक वर्गाची आर्थिक परिस्थिती बेताची असल्याने सर्व विद्यार्थ्यांजवळ पुरेशे शैक्षणिक साहित्य उपलब्ध नव्हते. स्वखर्चातून मुलांना सचित्र अंकलिपी, पाटी, पेन्सील वाटप करण्यात आले. हेल्पिंग हॅडस् अहेरी या सामाजिक संस्थेने विद्यार्थ्यांना गोष्टीचे लहान लहान पुस्तके, चौकट वहया दिल्या. त्यातून सर्वांना आवश्यक साहित्य उपलब्ध झाले.


६) बिना भिंतीच्या गोटूलमध्ये रचलेल्या उपक्रमाचे साहित्य ऊन, वारा, पाऊस यापासून खूप काळजीपूर्वक ठेवावे लागले.

७) पायाभूत भाषिक क्षमता व भाषा समृध्दता यासाठी पुरक वाचन सामुग्री विद्यार्थ्यांना सहज उपलब्ध होण्यात अडथळा होता. मुलांना सहजपणे वाचन करता येईल किंवा वाचनाची गोडी वाढेल असे उपयुक्त आणि आकर्षक असे वाचन कट्टे गोटूलमधील मिनी शाळेत उभे करण्यात आले.


**V) माहितीचे विश्लेषण आलेख तक्ते :-**

या नवोपक्रमात शिक्षक, विद्यार्थी व पालक यांची आंतरक्रिया योग्य प्रकारे साधली गेली. मुक्त व आनंदपूर्ण वातावरणात मुलांनी शिक्षणाची अनुभूती घेतली. त्यातून अपेक्षित उद्दिष्टे साध्य झाली व गुणात्मक पातळीत वाढ झाली. किमान संपादणूक व क्षमता साध्य करण्यात यश प्राप्त झाले. नवोपक्रमाच्या सुरुवातीच्या काळात पूर्व चाचणी घेतली. यात विद्यार्थी क्षमता कौशल्य आणि वर्तन याचे निरीक्षण करुन योग्य प्रकारे नोंदी ठेवण्यात आल्या. उपक्रमानंतर समांतर उत्तर चाचणी घेतली. मुलांतील समाधानकारक बदल व प्रगती व त्याचा आलेख दृष्टीक्षेपात आला. याशिवाय आणखी एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे विद्यार्थ्यांमध्ये अपेक्षित पायाभूत क्षमता, अध्ययन निष्पत्ती साध्य करण्यात यश प्राप्त झाले. खालील आलेख व तक्त्याव्दारे दर्शविण्यात आले.


**इ. पहिली पूर्व व उत्तर चाचणीतील विद्यार्थीनिहाय गुणातील फरक दर्शविणारा आलेख.**




**इ. दुसरी पूर्व व उत्तर चाचणीतील विद्यार्थीनिहाय गुणातील फरक दर्शविणारा आलेख**



**इ. तिसरी पूर्व व उत्तर चाचणीतील विद्यार्थीनिहाय गुणातील फरक दर्शविणारा आलेख**




| मूल्यमापनासाठी वापरलेली तंत्रे | मूल्यमापनासाठी वापरलेली साधने |
|---|---|
| • मुलाखत<br>• निरीक्षण | • पूर्व व उत्तर चाचणी<br>• पदनिश्चयन श्रेणी |

● उपक्रम पूर्ण झाल्यावर खालीलप्रमाणे निरीक्षणे नोंदविण्यात आले. ●

| अ.क्र. | विद्यार्थ्यांचे नाव | अपेक्षित उदिदष्टे | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | प्रारंभिक स्तर | | अक्षर | | शब्द | | वाक्य | |
| | | पूर्व | उत्तर | पूर्व | उत्तर | पूर्व | उत्तर | पूर्व | उत्तर |
| १ | आयुष सोमलाल लकडा | √ | | | | | √ | | |
| २ | प्रिरींश जगेश्वर तिग्गा | √ | | | √ | | | | |
| ३ | अनूजा अजित लकडा | √ | | | | | √ | | |
| ४ | प्रियंका मनू उईके | √ | | | | | √ | | |
| ५ | रेश्मा गिसू आतलामी | √ | | | √ | | | | |
| ६ | चांदनी बिरजू आतलामी | | | √ | | | | | √ |
| ७ | खुशी मधूकर आतलामी | √ | | | | | √ | | |
| ८ | परमेश्वर जवाहिर एक्का | √ | | | | | √ | | |
| ९ | रोशन किसनू लकडा | √ | | | | | √ | | |
| १० | करुणा गिसू आतलामी | | | √ | | | | | √ |

**अक्षर स्तरावर = २ शब्दस्तरावर = ६ वाक्यस्तरावर = २**

६) **<u>नवोपक्रमाची यशस्विता</u>** :-

नवोपक्रम कर्त्याने निश्चित केलेली उद्दिष्टे पूर्व चाचणी व उत्तर चाचणीतील गुणांवरुन कितपत साध्य केली आहेत ते लगेच आपल्या लक्षात येते. यावरुन नवोपक्रमाची यशस्विता खालील प्रमाणे आहे.

१) पूर्व चाचणीव्दारे विद्यार्थ्यांच्या वाचनासंदर्भात समस्येचा शोध घेतला असता त्यावरुन उपक्रमाची रुपरेखा ठरविण्यात पूर्वचाचणी उपयुक्त ठरली. विविध उपक्रमांचे आयोजन करुन विद्यार्थ्यांना वाचन करतांना येणाऱ्या समस्या दूर करण्यात आले.

२) सर्व विद्यार्थी प्रमाण भाषेतून वाचन करु लागली व बोलू लागली.

३) विद्यार्थ्यांना वाचन करता येण्यासाठी वाचन विकसनासाठी उपक्रम अंमलबजावणी अतिशय उपयुक्त ठरली आहे. विद्यार्थी प्रमाण भाषेतील गाणी, कथा व गोष्टी मोठया आवडीने श्रवण करु लागली. अवघड व ओजड वाटणारी प्रमाण भाषा सोपी वाटायला लागली. बोली भाषेतून शिक्षणामुळे विद्यार्थी व पालकांमध्ये शाळा व शिक्षकाविषयी आस्था, प्रेम, जिव्हाळा वाढला.

४) अध्ययन-अध्यापनात परिस्थितीनुसार सहज उपलब्ध होणाऱ्या शैक्षणिक साधनांचा वापर करुन अध्ययन अध्यापन प्रक्रिया कृतीशील झाली. निसर्गाकडूनही आपल्याला शिकता येते याची विद्यार्थ्यांना जाणीव झाली.

५) विद्यार्थ्यांची शाळेतील उपस्थिती १०० टक्के झाली. विद्यार्थी आनंदाने, आवडीने शाळेत येऊ लागली. भाषा विषयाचे अध्ययन-अध्यापन प्रक्रिया रंजक व आनंदाने होऊ लागली.

६) विविध उपक्रमांव्दारे विद्यार्थ्यांना स्वयंअध्ययनास प्रवृत्त करुन आवड निर्माण झाली.

७) बोली भाषेतून शिक्षणामुळे व शाळेची पर्यायी व्यवस्था गोटूलमध्ये केल्यामुळे विद्यार्थी पालकांमध्ये शाळा, शिक्षक व शिक्षणाविषयी आस्था, प्रेम, जिव्हाळा वाढला.

८) शाळेची पटसंख्या १ वरुन १० झाली. शाळेच्या पटसंख्येचा आलेख अजूनही चढता आहे.

९) सदर नवोपक्रमामुळे व शाळेतील एकूण परिस्थितीमुळे News18 या न्युज चॅनेलनी सदर शाळेची बातमी प्रसारित केली व सगळयाच वर्तमान पत्रांनी शाळेची बातमी देऊन 'गोटूलमधील शाळा' सर्वांचे लक्ष वेधून घेतले.

त्यात लोकमत वृत्तपत्राने तर महाराष्ट्र राज्यातील सर्वच आवृत्त्यांत मुख पृष्ठावर बातमी देवून सर्वांचे लक्ष वेधून घेतले. शाळेला लवकरात लवकर इमारत देण्याच्या हालचाली प्रशासकीय पातळीवर वेगाने सुरु आहेत व लवकरच शाळेला सुसज्य इमारत मिळण्याचे संकेत मिळाले. आपली शाळा प्रकाश झोतात आली ही बाब गावकऱ्यांना व शिक्षकांना नवचैतन्य देणारी ठरली. सर्वांनी या उपक्रमाला भरभरुन प्रतिसाद दिला. अधिकारी, पदाधिकारी व शिक्षण प्रेमींनी शाळेला सदिच्छा भेटी देऊन उपक्रमाची स्तुती करुन कौतुकाची थाप दिली.

**७) <u>समारोप</u> :-**

माझ्या शाळेच्या गावात माडिया भाषेचे प्राबल्य असल्यामुळे विद्यार्थ्यांना प्रमाण भाषा अजिबात समजत नव्हती. अक्षर-शब्द-वाक्य वाचन नीट करता येत नव्हते म्हणून मी वाचन कौशल्याशी निगडीत उपक्रम निर्मिती करुन तो राबविण्याचे ठरविले. माडिया बोली भाषेतून विद्यार्थ्यांचे अक्षर-शब्द-वाक्य ज्ञान वाढवून वाचन कौशल्य विकसित करणे हा नवोपक्रम विषय निवडला हेच या नवोपक्रमाचे वेगळेपण आहे. राज्यातील अतिशय दुर्गम, डोंगराळ, आदिवासी भागात सेवा करणाऱ्या तमाम शिक्षक बांधवांना हा माझा बिनखर्चिक नवोपक्रम नक्कीच उपयुक्त व पथदर्शी ठरु शकतो असा माझा विश्वास आहे. स्थानिक बोली भाषेतून विद्यार्थ्यांना अध्ययन-अध्यापन करुन अक्षर-शब्द-वाक्य ज्ञानाचे दृढीकरण करणे हे माझ्या नवोपक्रमाचा उददेश आहे. निसर्गातून मिळणाऱ्या घटकापासून शैक्षणिक साहित्य तयार करुन विद्यार्थ्यांचे वाचन कौशल्य वाढविले. वेळोवेळी पर्यवेक्षीय अधिकाऱ्यांनी शाळेला भेटी देवून उपक्रमाचे कौतूक करुन उत्साह वाढविला व विद्यार्थ्यांच्या मूल्यमापनातून विद्यार्थ्यांचा शैक्षणिक व गुणात्मक विकास झाल्याची कबुली दिली. उपक्रम राबविल्याचा आनंद मिळाला. माझ्या उपक्रमामध्ये सहकार्य करणाऱ्या, मला प्रेरणा देणाऱ्या, सर्वाचा मी ऋणी आहे.

सदर नवोपक्रम राबविण्यासाठी श्री. दिपक देवतळे साहेब, गटशिक्षणाधिकारी पं. स. एटापल्ली, श्री. विनायक पुरकलवार सर (गट्टा बिट विस्तार अधिकारी), श्री. बेडके सर, केंद्रप्रमुख गट्टा यांचे सर्वांचे मार्गदर्शन मिळाले. SMC अध्यक्ष श्री. केशव लेकामी, स्वयंपाकी मदतनीस श्री. झिल्लो लकडा, शाळा व्यवस्थापन समिती सदस्य, सर्व ग्रामस्थ यांचे मोलाचे सहकार्य लाभले. संगणकाचे काम करुन देणारे श्री. साईनाथ शिवराम औतकर, अहेरी यांचेही खूप खूप ऋणी आहे. त्याचप्रमाणे या उपक्रमात सहभागी असणारे माझे विद्यार्थी व माझा पालक वर्ग या सर्वाचा मी मनापासून आभारी आहे.

## ८) संदर्भसूची व परिशिष्टे :-

### I) संदर्भसूची

| अ.क्र. | पुस्तकाचे नाव | लेखक/प्रकाशन |
|---|---|---|
| १ | शालेय नवोपक्रम | म. रा. शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे |
| २ | दिशा नवोपक्रमाच्या मार्च २०१४ | म. रा. शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे |
| ३ | आम्ही माडिया | एम. डी. रामटेके |
| ४ | वाचन सुधार पुस्तिका | भाषा अध्ययन समृध्दी पेटी |
| ५ | भाषिक खेळ | म. रा. शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे |
| ६ | गोंडवानाचा सांस्कृतिक इतिहास | शेषराव एन. मडावी |

### II) परिशिष्टे

### अ) विद्यार्थी यादी -

| रोल नं. | विद्यार्थ्यांचे नाव | वर्ग |
|---|---|---|
| १ | आयुष सोमनाथ लकडा | इ. १ ली |
| २ | प्रिरीस जगेश्वर तिग्गा | इ. १ ली |
| ३ | अनुजा अजित लकडा | इ. १ ली |
| ४ | प्रियंका मनू उईके | इ. १ ली |
| ५ | रेश्मा गिसू आतलामी | इ. १ ली |
| ६ | चांदणी बिरजू आतलामी | इ. २ री |
| ७ | खुशी मधूकर आतलामी | इ. २ री |
| ८ | परमेश्वर जवाहिर एक्का | इ. २ री |
| ९ | रोशन किसनू लकडा | इ. २ री |
| १० | करुणा गिसू आतलामी | इ. ३ री |

**ब) पूर्व चाचणी (तोंडी परीक्षा)**

# नवोपक्रम पूर्व चाचणी (तोंडी परीक्षा)

## इयत्ता १ ली / २ री / ३ री

एकूण गुण : २५

विद्यार्थ्याचे नाव : मिळालेले गुण :

शाळेचे नाव : जि. प. प्राथमिक शाळा, वाळवी पं. स. एटापल्ली जि. गडचिरोली

---

**प्रश्न क्र. १ : सारख्या अक्षराच्या जोडया जुळवा.** **गुण ०५**

| | |
|---|---|
| फ | द |
| द | र |
| क | य |
| य | फ |
| र | क |

**प्रश्न क्र. २ : दिलेल्या मुळाक्षरासारख्या मुळाक्षराला गोल करा.** **गुण ०५**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ड | = | डमरु | डब्बा | डाग | डमडम |
| ढ | = | गाढव | ढग | चढ | ढवळा |
| ण | = | सण | बाण | पण | पणती |
| ट | = | टपाल | वाट | नाटक | पाट |
| ठ | = | ठणक | ठक | ठपका | ठसा |

**प्रश्न क्र. ३ : सारख्या अक्षराला वाचून गोल करा.** **गुण ०५**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| का | = | दा | वा | का | ला |
| फु | = | जु | नु | फु | यु |
| ती | = | मी | ती | जी | की |
| से | = | रे | से | जे | वे |
| मो | = | बो | सो | हो | मो |

**प्रश्न क्र. ४ : चित्र ओळखून चित्राच्या नावाची जोडी जुळवा.** **गुण ०५**



बस



मासा



सायकल



झाड



ससा

**प्रश्न क्र. ५ : खालील शब्द वाच.** **गुण ०५**

१) नळ

२) काम

३) गार

४) मानव

५) चतुर

क) उत्तर चाचणी (तोंडी परीक्षा)

# नवोपक्रम उत्तर चाचणी (तोंडी परीक्षा)

## इयत्ता १ ली / २ री / ३ री

एकूण गुण : २५

विद्यार्थ्याचे नाव : मिळालेले गुण :

शाळेचे नाव : जि. प. प्राथमिक शाळा, वाळवी पं. स. एटापल्ली जि. गडचिरोली

---

**प्रश्न क्र. १ : सारख्या अक्षराच्या जोडया जुळवा.** **गुण०५**

| | |
|---|---|
| झ | भ |
| ढ | थ |
| थ | ढ |
| प | झ |
| भ | प |

**प्रश्न क्र. २ : दिलेल्या मुळाक्षरासारख्या मुळाक्षराला गोल करा.** **गुण ०५**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ज | = | जहाज | रजई | जमा | जागा |
| ल | = | वाल | लसून | चाल | ढाल |
| व | = | वजन | वसई | जावई | जवळ |
| य | = | गाय | माय | सायकल | नायक |
| म | = | मका | राम | घाम | रमाई |

**प्रश्न क्र. ३ : सारख्या अक्षराला वाचून गोल करा.** **गुण ०५**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| जी | = | मी | की | ली | जी |
| लु | = | जु | नु | लु | फु |
| मा | = | दा | मा | का | ता |
| दे | = | दे | से | ने | शे |
| वो | = | खो | ढो | वो | मो |

**प्रश्न क्र. ४ : चित्र ओळखून चित्राच्या नावाची जोडी जुळवा.** **गुण ०५**



बटाटा



बकरी



घर



डोळा



नाग

**प्रश्न क्र. ५ : खालील शब्द वाच.** **गुण ०५**

१) चाकर
२) झाड
३) चटई
४) कुमार
५) वाटी

**ड) पदनिश्चयन श्रेणी**

आवर्तन १ घेण्यापूर्वी विद्यार्थ्यांच्या सहभागाचे मूल्यमापन पदनिश्चयन श्रेणीव्दारे करण्यात आले.

विद्यार्थ्याचे नाव : मिळालेले गुण : २५


इयत्ता : रोल नं.

(उत्तम : - ३ गुण , चांगला : - २ गुण, साधारण : - १ गुण

शाळेचे नाव : जि. प. प्राथमिक शाळा, वाळवी पं. स. एटापल्ली जि. गडचिरोली

| **अनु. क्र.** | **उपक्रमाचे नाव** | **खेळातील सहभाग** | | |
|---|---|---|---|---|
| | | **उत्तम** | **चांगला** | **साधारण** |
| १ | चला अक्षरे ओळखू या | | | |
| २ | मुळाक्षरांचे सापशिडी | | | |
| ३ | ताड पत्र कोणाचे ? | | | |
| ४ | शब्दनिर्मिती करु या. | | | |
| ५ | उच्चारातील फरक ओळखू या. | | | |
| ६ | टोपलीत दडलयं काय ? | | | |
| ७ | शब्दाचे झाड कोणाचे ? | | | |
| ८ | शब्द वाक्यपट्टया वाचू या | | | |
| ९ | स्मृतीफलकावरील शब्द डोंगर वाचू या. | | | |
| १० | लपलेल्यांना शोधा. | | | |
| ११ | झाडांची पाने वाचू या | | | |

## इ) अभिप्राय :- नवोपक्रमाबाबत निवडक प्रतिक्रिया व अभिप्राय....



दि. १६.११.२०२२


आज दिनांक १६।११।२०२२ रोजी जि. प. प्राथ. शाळा वाळवी या शाळेतील गोटूलमधील मिनी शाळेला भेट दिली असता, शाळेची इमारतीची परिस्थिती बघुन श्री श्रीकांत गटरया काटेलवार प्रभारी मुख्याध्यापकांनी गोटूलमध्ये शाळा भरवून आदिवासी दुर्गम भागात विद्यार्थ्यांना शिक्षणाचे धडे देण्याचा प्रयत्न खरचं कौतुकास्पद आहे. वाट कितीही बिकट असली तरीही त्यातूनही मार्ग काढता येते सदर शिक्षकांनी दाखवून दिले.

गोटूलमध्ये मुलांना बोलीभाषेतून शिक्षण देण्याचे काम शिक्षकांचा सुरु आहे.

ताडी झाडाचे फळे बनविले आहे, झाडाच्या फांदयाचाही सुंदर शैक्षणिक साहित्य बनविले. मुळाक्षरांची सापशिडी, ताडी झाडाच्या फांदयावरील बाराखडी मुले अचुक वाचतात. नैसर्गिक साहित्य बनवून त्यातून विद्यार्थ्यांना शिक्षण दिले जात आहे. गोटूलला विविध्यपूर्ण शैक्षणिक साधनांनी सजावट बनवून मिनि शाळाच तयार केली आहे. सदरच्या उपक्रमामुळे शाळेची पटसंख्या व उपस्थिती मध्ये वाढ झाली आहे सदर शिक्षकांनी स्वत: मेहनत करुन सर्व साहित्य बनविले पेंटीग, द्विभाषीक चार्ट, मंडपात पानाचे तोरणे शिक्षकांनी तयार करुन त्यातून शिक्षण देण्याचा प्रयत्न वाखण्याजोगी आहे.

पूढील कार्यास शुभेच्छा..।

[signature]
मु. कु. माहोर
गविअ. पं. स. एटापल्ली
जि. प. गडचिरोली



अभिप्राय... दि. ११।११।२०२२

जिल्हा परिषद प्राथ. शाळा वाळवी ता एटापल्ली या शाळेला दिनांक ११।११।२०२२ रोजी भेट दिले सदर शाळेची किर्ती सर्व महाराष्ट्र भर पसरली सदर शाळेतील बोली भाषेतून शिक्षण निसर्गातिल साधनांचा वापर करुन मुलांना शिक्षण दिले जाते.

वाचन विकासासाठी श्री. एस. जी. काटेलवार सरांनी योजलेले नानाविध उपक्रम कौतुकास्पद आभिनंदनीय आहे. माडीया भाषिक विद्यार्थ्यांना निसर्गाच्या सहवासात गोटूलमध्ये अध्ययन अध्यापन सुरु आहे.


गोटूलमधील ताडी झाडाचा फळा करून, तसेच ताडी झाडाचा फांदयाचा तयार केलेले शैक्षणिक साधने खरचं कौतुकास्पद आहे. शब्दाचे झाड, अक्षराची सापशिडी, येपलीत दडलय काय? वाक्य वाचन पट्यां पेटी, चला अक्षरे ओळखुया. स्मृती फलक अभिनव उपक्रमाची मांडणी गोटूलमध्ये योजले आहे अतिशय दुर्गम भागातील सदर शाळेतील अभिनव शिक्षण उपक्रम खुप छान आहे विद्यार्थ्यांच्या वाचन-लेखन विकासासाठी खूप उपयोगी आहे.

श्री. एस. जी. काटेलवार सरांचे खूप खूप अभिनंदन व पूढील वाटचालीसाठी खूप खूप शुभेच्छा।

[signature]
मा. एस. एम. गोटा
मा. जि. प. सदस्य
गडचिरोली मु. गट्टा

[signature]
सौ. सैलाबाई गोटा
मा. प. स. सदस्य एटापल्ली
मु. गट्टा

एटापल्ली तालुक्याचे गटविकास अधिकारी श्री. माहोर साहेब व जि. प. सदस्य श्री. सैनूजी गोटा साहेब, सौ. शिला गोटा पं. स. सदस्य यांची नवोपक्रमास भेट व त्यांचा अभिप्राय.



वाळवी
दि. १७।११।२०२२


आज दिनांक १७।११।२०२२ ला जि. प. प्राथ. शाळा वाळवी येथे भेट दिले शाळेचे उपक्रमशील शिक्षक श्री एस. जी. काटेलवार शाळेत नाविन्यपूर्ण उपक्रमाचे विद्यार्थ्यांना धडे देताना आढळले विद्यार्थी आनंदाने शिक्षणात रममान झाल्याचे दिसले.

या शाळेतील नवोपक्रमाचे ठळक मुद्दे

1) शाळेचे पक्की इमारती नसल्याने पर्यायी व्यवस्था म्हणून गोटूलमधिल मिनीशाळा तयार केले.
2) बोली भाषेकडुन प्रमाणभाषेमध्ये शिक्षण देणे.
3) ताडी झाडाचे फळे बनवून उत्कृष्ट अध्यापन.
4) पानांचे शैक्षणिक तोरण तयार केले.
5) मुळाक्षरांची सापशिडी तयार केले
6) ताडीच्या झाडाच्या फांदयापासून बाराखडी तयार केले
7) दगडावर स्मृती फलक तयार केले.
8) दगडावर शब्द फलक तयार केले.
9) द्विभाषिक तक्ते तयार केले.
10) शब्दांचे झाड तयार केले.

वरील सर्व साधने हे निसर्गाच्या साहित्यापासून कमी खर्चामध्ये तयार करून उत्कृष्ट अध्यापन करण्याचे उल्लेखनिय काम करीत आहेत.

[signature]
केंद्र प्रमुख
गट्टा.



वाळवी
दि. १७.११.२०२२

आज दिनांक १७.११.२०२२ रोजी जि.प.प्रा.शाळा वाळवी येथे निपुण भारत उपक्रमांतर्गत "माता / पालक गट" प्रत्यक्ष भेट सदर शाळेस दिली असता प्रभारी मुख्याध्यापक श्री. श्रीकांत काटेलवार कर्तव्यावर उपस्थित होते. शाळेची मुख्य ईमारत [illegible] जिर्णावस्थेत / धोकादायक स्थीतीत असल्याचे दिसले. ही बाब श्री. श्रीकांत काटेलवार स. शिक्षक यांनी [illegible] शाळेच्या समोरच मोकळ्या जागेत "मिनी गोटूल शाळा" ची निर्मिती करून स्वप्रेरणेने आदिवासी दुर्गम भागात विद्यार्थ्यांना शैक्षणिक कार्य [illegible] करण्याचे त्यांचे प्रयत्न कौतुकास्पद आहे.

शाळेची मुख्य ईमारत जिर्णावस्थेत असल्याने श्री. श्रीकांत काटेलवार सरांनी ताडीच्या झाडांची [illegible], फांद्या यावर सुंदर मुळाक्षरे, वाक्य, शब्द इ. [illegible] रेखाटन करून शैक्षणिक बाबतीत अधिकची भर घातल्याचे व सदर बाबींचा विद्यार्थ्यांना शैक्षणिक बाबतीत लाभ होत असल्याचे दिसून आले.

सदर शाळेत श्री काटेलवार सरांनी शाळेचा पट 01 होता. स्थानिक शाळेचा पट 10 असून नाविन्यपूर्ण शैक्षणिक साधनांमुळे विद्यार्थी नियमित शाळेत येत असल्याचे प्रत्यक्ष भेटी वरून दिसून आले.

महत्वाचे म्हणजे श्री श्रीकांत काटेलवार सरांनी स्वप्रेरणेने ताडीच्या झाडाच्या [illegible] वापर, पानांचा वापर, त्यावर पेंटींग तसेच "पाऊर" च्या झाडांच्या पानांचे तरणे अक्षर, शब्द तयार करून "लाडपत्र वान्तूसा" हा उपक्रम राबविण्यात येत असल्याचे दिसून आले.

सदर शाळा / गांव अत्यंत दुर्गम भागात असून शिक्षकांचे प्रयत्न आदिवासी विद्यार्थ्यांमध्ये शैक्षणिक आवड निर्माण करणे व शैक्षणिक दर्जा उंचावणे असल्याचे दिसून आले. त्यांचे हे प्रयत्न वाखाण्याजोगे आहे.

पुढिल कार्यास शुभेच्छा !

[signature]
वि. त.
ग. सा. के. एटापल्ली
श्री. दिलिप पुजारी

[signature]
वि. साधनव्यक्ती
ग. सा. के. एटापल्ली
श्री. [illegible]

गट्टा केंद्राचे केंद्रप्रमुख व विषय तज्ञ (BRC) यांची नवोपक्रमास सदिच्छा भेट व त्यांचा अभिप्राय.

-: समाप्त :-